
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 2 JAN 2018

महाराष्ट्र टाईम्स



जानेवारी महिन्यातील रविवारची सुरुवात अशा चांगल्या उपक्रमाने होत असल्याने कोल्हापूरकरांसाठी ही आनंदाची पर्वणीच आहे. हॅपी स्ट्रीटवर आल्याने रविवारचा आनंद, जल्लोषाचा आहे असे जाणवते. मटाचा हा उपक्रम खरोखरच स्तुत्य असाच आहे.

– डॉ. डी. टी. शिर्के,
प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2018
पुढारी

# सुराज्य बनविण्यासाठी शिक्षण प्रसार एकमेव मार्ग : डॉ. हिर्डेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**




स्वातंत्र्याचे सुराज्य बनविण्याकरिता शिक्षण प्रसार हाच एकमेव मार्ग आहे. त्यासाठी ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार या तत्त्वज्ञानाने महाराष्ट्राचा शैक्षणिक आराखडा डॉ. बापूजी साळुंखे यांनी तयार केला व आपल्या स्वतःच्या विचाराने एक सामान्य शिक्षक ते शिक्षण संस्था असा महाराष्ट्रभर गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा प्रसार केला. आज अनेक पदांवर विवेकानंद शिक्षण संस्थेतील विद्यार्थी वर्ग कार्यरत असल्याचे प्रतिपादन डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी येथे केले.


शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागामार्फत आयोजित 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व्याख्यानमालेत' २१ व्या शतकातील उच्च शिक्षणासमोरील आव्हाने' या विषयावर डॉ. हिर्डेकर बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते.

डॉ. हिर्डेकर म्हणाले, २१ व्या शतकासमोरील शैक्षणिक आव्हाने पेलताना डॉ. आप्पासाहेब पवार, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बापूजी साळुंखे यांनी उभे केलेले शैक्षणिक प्रयोग निश्चितपणे आपल्याला उपयोगी पडतील.

आपण शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची कार्यसुत्री तयार केली पाहिजे. त्याच बरोबर विद्यार्थ्यांना मागेल त्यावेळी मागेल त्या ठिकाणी शिक्षण पोहोचवले पाहिजे. हीच २१ व्या शतकाची गरज आहे. डॉ. सुमन बुवा यांनी स्वागत व पाहुण्यांची ओळख करून दिली. आभार प्रा. यशोधन बोकील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2018

सकाळ



भरती प्रक्रियेसाठी सहभागी झालेले विद्यार्थी.

# सेंट्रल प्लेसमेंट सेलच्या भरतीला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलतर्फे टेक्निक आयटी एनबेल्ड सर्व्हिसेस प्रा. लि. या कंपनीत विषयतज्ज्ञ या पदासाठी भरती प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले होते. भरती प्रक्रिया ही एम.एस्सी. (गणित, संख्याशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र), एम. ए. (इंग्रजी, अर्थशास्त्र), एम. कॉम. या विषयांत शिकणाऱ्या व माजी विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली. सदर भरतीला विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. जी. एस. गोकावी यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. सेंट्रल प्लेसमेंट अधिकारी डॉ. जी. एस. राशिनकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलमार्फत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. प्रा. गोकावी यांनी मार्गदर्शन केले. कंपनीचे अधिकारी तेजस जगताप यांनी कंपनीच्या कार्यप्रणालीबाबत माहिती दिली. वेतन व भविष्यातील संधींबाबत त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. संख्याशास्त्र विषयाचे प्रा. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले. विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा झाली. परीक्षांचे निकाल हे पंधरा दिवसांत जाहीर होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2018
पुढारी

# विद्यापीठामध्ये पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी टेक्निट आय. टी. नोकरी भरती

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलमार्फत टेक्निट आय. टी. एनेबल्ड सर्व्हिसेस प्रा. लि. या कंपनीमध्ये विषयतज्ज्ञ या पदासाठी भरती प्रक्रियेचे आयोजन करण्यात आले होते. सदर भरती प्रक्रिया ही एम.एस्सी. (गणित, संख्याशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र), एम. ए. (इंग्रजी, अर्थशास्त्र), एम. कॉम. या विषयांमध्ये शिकणाऱ्या व माजी विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली होती. शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील सभागृहामध्ये प्रक्रिया झाली. भरती प्रक्रियेस विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. ३८१ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग घेतला. उद्घाटन रसायनशास्त्र विभागप्रमुख मा. डॉ. जी. एस. गोकावी यांचे हस्ते झाले. सेंट्रल प्लेसमेंट अधिकारी डॉ. जी. एस. राशिनकर यांनी शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेल मार्फत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विषयाचे प्रा. डॉ. सोमनाथ पवार यांनी आभार मानले. सर्व उपस्थित विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. लेखी परीक्षांचे निकाल हे पंधरा दिवसांत जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2018
Times of India

# SUK invites exam applications for CDE

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has invited applications for the upcoming summer semester of its centre for distance education (CDE).

SUK in a circular stated that students should apply for the exam by February 15 with regular fee.

In a notification dated January 21, Mahesh Kakade, director of Board of Examinations and Evaluation, SUK, said that results for BA, BCom, MA, MCom, MSc and MBA examinations held in October 2017 have been declared online.

The results are available on— online.shivajiuniversity.in.

Students have been asked to fill in applications forms for the upcoming summer semester examination to be held in 2018 by February 15 with regular fee, and by February 22 with a late fee of Rs 50.

The students will get a final chance to fill in their applications by March 1 with a super late fee ranging from Rs 50 to Rs 300.

According to officials of SUK's exam department, students should make sure they adhere to the given deadline. The exam department will not extend the deadline in any case.

**Students have been asked to fill in applications forms by February 15 with regular fee, and by February 22 with a late fee of Rs 50**

An official said, "It has been observed that students do not follow their deadline seriously and do not submit the form on time. Since semester exams provide very little time to the department for preparations, students should also cooperate to make things easier for everyone."

It may be noted that the CDE offers courses for ten educational programs including professional ones like master in business administration (MBA) in 30 study centres across Sangli, Satara and Kolhapur districts. Currently more than 50,000 students are studying in CDE under various programs.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2018
सकाळ

# भूगोल विभागातर्फे माहिती प्रणाली ओळख

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठाच्या भूगोल अधिविभागास भूगोल दिनाचे औचित्य साधून ग्रामीण शालेय विद्यार्थ्यांत भूगोल विषयासंबंधी रुची निर्माण करण्यासाठी 'ओळख भौगोलिक माहिती प्रणालीची' हा कार्यक्रम झाला. कार्यक्रमासाठी विकास विद्यामंदिर, पाडळी या ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांना बोलविण्यात आले. आधुनिक भूगोलात होणाऱ्या तंत्रज्ञानाच्या वापरासंबंधी विशेष माहिती देऊन प्रात्यक्षिके घेण्यात आली. डॉ. प्रशांत पाटील यांनी विद्यार्थ्यांना सुदूर संवेदन व उपगृहिय छायाचित्रे यांची सखोल ओळख करून दिली. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा झाल्या. जीआयएस, जीपीएस व चित्रकला स्पर्धा झाल्या. भूगोल विभागाचे प्रमुख डॉ. एस. एस. पन्हाळकर यांनी 'भूगोलाचे महत्त्व' या विषयावर मार्गदर्शन केले. भौगोलिक माहितीपट व बक्षीस वितरण झाले. या वेळी विकास विद्यामंदिर, पाडळी या शाळेचे मुख्याध्यापक भीमराव पाटील, मारुती पाटील, गणपत गायकवाड, विद्या चौगुले उपस्थित होते. ओंकार परब यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2018

**पुढारी**



कोल्हापूर : सॉफ्टबॉल स्पर्धेत अजिंक्य ठरलेला महावीर कॉलेजचा संघ सोबत प्राचार्य आर. पी. लोखंडे, डॉ. बाबासो उलपे, डॉ. रोहित पाटील आदी.

# आंतरविभागीय सॉप्टबॉल स्पर्धेत महावीर महाविद्यालय अजिंक्य

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठांतर्गत झालेल्या आंतरविभागीय सॉप्टबॉल स्पर्धेत अत्यंत चुरशीच्या सामन्यात महावीर महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने शहाजी कॉलेजचा ३-० असा पराभव करून स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविले स्पर्धेत १७ महाविद्यालयांच्या संघांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर झाली. स्पर्धेचे बक्षीस वितरण क्रिकेटपटू बबन पाटील यांच्या हस्ते झाले. स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू असे : बेस्ट पीचर : स्वप्निल गदादे (शहाजी कॉलेज), बेस्ट कॅचर : अमोल खुटाळे (महावीर महाविद्यालय), बेस्ट फिल्डर : विनायक जाधवर यांनी प्रवीण्य मिळविले. विजयी संघात अशपाक शकलगार, कल्पेश चव्हाण, दीपक कायपुरे, अमोल खुटाळे, निखील लाटकर, अमोल भोईटे, सिद्धेश फोंडके, कपिल लोहार, अनिकेत पाटील, अनुभव कवडे, चेतन गोरल, प्रसाद कुंभार यांचा समावेश आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JAN 2018
लोकमत

# शैक्षणिक बदलांना सामोरे जावे : डेळेकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**गारगोटी** : समाजातील आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी आदर्शवादी बनून येणाऱ्या शैक्षणिक बदलांना सामोरे जावे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्रा. सागर डेळेकर यांनी केले.

मुदाळ (ता. भुदरगड) येथील परशराम बाळाजी पाटील माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या २६ व्या वार्षिक स्नेहसंमेलनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सद्गुरु बाळूमामा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार के. पी. पाटील होते. संस्थेचे खजानीस रणजितसिंह पाटील, प्राचार्य एस. पी. मोरे, सरपंच शीतल माने, विनायक पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्याध्यापक एस. एम. पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. सुपरवायझर एस. व्ही. रणदिवे, ए. एस. कळंत्रे, एम. के. पाटील, एस. डी. खतकर, ए. एम. पाटील, ए. ए. महाजन, मनीषा कोरवी, आदी उपस्थित होते.